**उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ ठाणे**
**राष्ट्रीय आरोग्य अभियान**
**पदभरती जाहीरात**

NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान
महाराष्ट्र

(www.nrhm.maharashtra.gov.in, https://arogya.maharashtra.gov.in)

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, ठाणे करिता रिक्त असलेल्या पदाची पदभरती प्रक्रियेसाठी खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे निव्वळ कंत्राटी स्वरूपात व करार पध्दतीने मानधन तत्त्वावर करावयाची आहे. तरी इच्छुक व पात्र उमेदवारांनी विहित नमुन्यात अर्ज उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ ठाणे, प्रादेशिक मनोरुग्णालय आवार, धर्मवीर नगर -२, ठाणे (प) ४००६०४ येथे दिनांक 14/07/23 ते 21/07/23 पर्यंत अर्ज सादर करावे.

| अ. क्र. | संस्थेचे नाव | पदाचे नाव | प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, ठाणे | प्रशासकीय अधिकारी | खुला -१<br>एकुण-१ | BCom/MCom+ ३ वर्षांचा पदाशी निवडीत अनुभव, MS- CIT, Tally ERP ९ Certificate व शासकीय/निमशासकीय सेवेतील अनुभवास प्राधान्य | कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे (राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत सेवेतील कार्यरत उमेदवारांकरिता कमाल सेवा प्रवेश मर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिल | रु. २०,०००/- |

## राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, ठाणे करिता रिक्त पदभरतीच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, ठाणे करिता प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यानुसार मंजुर पदांपैकी रिक्त पद भरण्याकरीता जाहिरात www.nrhm.maharashtra.gov.in, https://arogya.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत असून अर्ज करावयाच्या पध्दतीबाबत सर्वसाधारण सुचना / माहिती खालील प्रमाणे देण्यात येत आहेत.

सर्व सूचनांचे काळजीपूर्वक वाचन करून अर्ज विहित केलेल्या पध्दतीनुसारच सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या नमुद माहितीच्या आधारे सादर केलेल्या प्रमाणपत्रांच्या/ कागदपत्रांच्या आधारे उमेदवार पात्र व अपात्र ठरविण्यात येईल, व त्या आधारे त्याचा समावेश पुढील निवड प्रक्रियेत करण्यात येईल.

अर्ज स्वीकारण्यात आला किंवा पुढील निवड प्रक्रियेत समावेश करण्यात आला म्हणजे उमेदवाराची निवड झाली असा होणार नाही. निवड प्रक्रिये दरम्यान कोणत्याही वेळी किंवा उमेदवाराच्या निवडी नंतर अर्जदार विहित अर्हता धारण करीत नसल्याने किंवा कोणत्या ही कारणास्तव अपात्र ठरत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमेदवाराची उमेदवारी / निवड तात्काळ रद्द करण्यात येईल.

**क) अर्ज करण्याच्या अनुषंगाने सुचना -**

१) सर्व उमेदवारांनी खालील नमूद गुगल लिंक वर ऑनलाईन गुगल फॉर्म मध्येच अर्ज विहित कालावधीत भरणे आवश्यक आहे.

✓ **आरोग्य व कुटुंब कल्याण, प्रशिक्षण केंद्र ठाणे रिक्त पदाकरिता-**
Link: **https://forms.gle/LoCdi1hLV9TvVtf78**

२) अर्जात दिलेल्या प्रत्येक मुद्याची माहिती अचूक भरावी. एकदा भरलेली माहिती अंतिम समजण्यात येईल व त्यात कोणताही बदल करता येणार नाही याची नोंद घ्यावी.



Scanned with CamScanner

३) गुगल फॉर्म परीपुर्ण भरल्यावर त्याची प्रिंट काढावी.

४) पुर्ण भरलेल्या गुगल फॉमची स्वसाक्षांकित प्रत व (ट) मधील मुद्दा क्र.७ नुसार सर्व कागदपत्रे उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ ठाणे, प्रादेशिक मनोरुग्णालय आवार, धर्मवीर नगर-२, ठाणे (प) ४००६०४ येथे (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) प्रत्यक्षात (By Hand) व कुरीअरने सादर करण्यात यावेत. दिलेल्या मुदतीनंतर सादर करण्यात येणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही. (टपालाने / कुरीयरने सादर करण्यात आलेले अर्ज विहीत कालावधीत या कार्यालयात पोहोचतील याची दक्षता घ्यावी. उशीरा प्राप्त अर्जाची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावीं.)

५) **अर्जदाराने प्रत्यक्ष भरलेल्या गुगलफॉर्मची प्रत या कार्यालयास प्राप्त न झाल्यास असा अर्ज अपूर्ण समजण्यात येऊन तो रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.**

**ख) वयोमर्यादा –**

१) गुगल अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिनांकास म्हणजेच दि:२०/०७/२०२३ रोजी उमेदवाराचे वय जाहिरातीत विहित केलेल्या वयोमर्यादेत असणे आवश्यक आहे.

२) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांच्या दि.२५/०२/२०२२ रोजीच्या शासननिर्णयानुसार एकाकी पदास आरक्षण लागू नाही त्यामुळे सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचे कडील दि.२५ एप्रिल २०१६ चे शासन निर्णयातील तरतुदीनुसार अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकास उमेदवाराचे किमान वय १८ वर्षे व कमाल वय खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्या दि. २९/०९/२०१८ रोजीच्या पत्रानुसार राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत सेवेतील कार्यरत उमेदवारांकरिता कमाल सेवा प्रवेश मर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल.

**ग) अर्ज भरण्याबाबतच्या सुचना –**

१) उमेदवाराने स्वतःचे पूर्ण नाव माध्यमिक शाळा प्रमाणपत्राप्रमाणेच अचूकपणे नोंदवावे. अर्जासोबत माध्यमिक शालांतपरीक्षा प्रमाणपत्राची प्रत जोडावी.

२) माध्यमिक शालांतपरीक्षा प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली जन्मतारीखच अर्जात नमूद करावी.

३) जाहिरात प्रसिध्द केलेल्या दिनांका पर्यत असणारे उमेदवाराचे वय (दिवस, महिने व वर्ष) अर्जात अचूक नमुद करावे.

४) अर्जात उमेदवाराचे लिंग या बाबतची माहिती नमूद करावी.

५) अर्ज करीत असणारी अर्जदार विवाहित असल्यास विवाहनोंदणी प्रमाणपत्र तसेच नाव बदल असल्यास राजपत्र (Gazette) अर्जा सोबत सादर करणे आवश्यक आहे.

६) अर्जामध्ये उमेदवाराने स्वतःचा वैध ई-मेल आयडी/ पर्यायी ई-मेल आयडी, चालू भ्रमणध्वनीचा क्रमांक/ पर्यायी भ्रमणध्वनीचा क्रमांक नमूद करणे बंधनकारक आहे. मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना मुलाखतीसंदर्भात देण्यात येणा-या सुचना ई-मेल व्दारे देण्यात येतील. पात्र उमेदवारांची यादी उपरोक्त नमुद संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. सदर ई-मेल आयडी पदभरती प्रक्रिया पुर्ण होई पर्यंत चालू राहील व ई-मेल वेळोवेळी तपासण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

७) पद भरतीबाबत पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची यादी आणि पदभरतीबाबतच्या आवश्यक सुचना व सुधारणा वेळोवेळी सदर www.nrhm.maharashtra.gov.in, https://arogya.maharashtra.gov.in संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येतील याकरिता वेळोवेळी संकेतस्थळावर भेट देणे देखील बंधनकारक आहे.

८) **उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवास आहे किंवा कसे हे नमूद करणे आवश्यक आहे, असल्यास त्याबाबतचे विहीत प्रमाणपत्र (Domicile Certificate) अर्जा सोबत सादर करणे आवश्यक आहे.**



Scanned with CamScanner

९) अर्जदाराने आपला सध्याचा पत्ता व कायमस्वरूपी पत्ता गुगल फॉर्म मध्ये अचूक नमूद करावा.

१०) अर्जदाराविरुद्ध कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा, याबाबतचे हमी पत्र देण्यात यावे.

घ) शैक्षणिक अर्हता/ पात्रता -

१) शैक्षणिक अर्हतेबाबतचा सविस्तर व अचूक तपशील नोंद करावा.

२) गुगल अर्ज सादर करावयाच्या शेवटच्या तारखेला उमेदवाराकडे जाहिरातीमध्ये नमुद केलेली शैक्षणिक अर्हता असणे आवश्यक आहे.

३) अर्ज भरत असताना अंतिम वर्षाला मिळालेले गुण व गुणांची टक्केवारी अचूकपणे नमूद करावी. ग्रेड अथवा अन्य श्रेणी नमूद न करता गुण व गुणांची टक्केवारी नमूद करणे अनिवार्य आहे. प्रमाणपत्रात नमूद गुण व गुणांची टक्केवारी अर्जात नमुद टक्केवारी न जुळल्यास असे अर्ज नामंजूर करण्यात येतील.

४) अंतिम प्रमाणपत्रामध्ये ग्रेड अथवा श्रेणी नमुद असल्यास संबंधित संस्थेकडून त्याचे गुणांमध्ये प्रमाणित करून घ्यावे. व अर्जासोबत सदर प्रमाणपत्र सादर करावे.

५) उमेदवारांची गुगल फॉर्ममध्ये नमुद माहितीनुसार अर्जाची छाननी करण्यात येईल.

६) पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता/ पात्रता ही शासकीय मान्यता प्राप्त विद्यापीठातूनच प्राप्त केलेली असणे आवश्यक आहे.

ङ) अनुभव -

१) शैक्षणिक अर्हता व आवश्यक अतिरिक्त शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतरचा संबंधित पदाशी निगडीत शासकीय व निमशासकीय अनुभव ग्राह्य धरण्यात येईल. त्यानुसार शैक्षणिक अर्हता धारण करण्यापूर्वीच्या अनुभवाची नोंद करण्यात येऊ नये. त्या अनुभवाची परिगणना करण्यात येणार नाही.

२) अनुभवाचा तपशील नमूद करीत असताना ज्या शासकीय व निमशासकीय कार्यालयाचे अनुभव प्रमाणपत्र प्राप्त आहे अशाच शासकीय व निमशासकीय कार्यालयाचा तपशील फॉर्म मध्ये नमूद करावा. अनुभव प्रमाणपत्र नसल्यास सदरचा अनुभव ग्राह्य धरण्यात येणार नाही. अनुभव प्रमाणपत्रामध्ये अनुभवाचा कालावधी सुस्पष्टपणे नमूद असावा.

३) अनुभव प्रमाणपत्रामध्ये तपशील नमूद करताना रूजू दिनांक व कार्यमुक्तीचा दिनांक अचूकपणे नमूद करावा. सदर कालावधी अनुभव प्रमाणपत्रानुसारच नोंदविण्याची दक्षता घ्यावी. यामध्ये तफावत आढळल्यास सदर प्रमाणपत्र अवैध ठरविले जाईल.

च) संगणक अर्हता -

१) MSCIT प्रमाणपत्र धारण करीत असल्याचा तपशील नमूद करावा.

छ) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र -

१) लहान कुटुंबाची अट दि.२३/०७/२०२० पासुन लागू करण्यात आली असून दि.२३/०७/२०२० पासुन दोन पेक्षा अधिक हयात मुले असणारे उमेदवार राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या पदभरतीसाठी अर्ज करण्यात पात्र ठरणार नाहीत. विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करावे.



Scanned with CamScanner

ज) अर्ज शुल्क -

१) उमेदवारास अर्जासोबत अर्ज शुल्काचा SBI बँकेचा धनाकर्ष जोडणे आवश्यक आहे. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता रू.५००/- रक्कमेचा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) अर्ज शुल्क असेल. SBI बँकेचा धनाकर्ष पुढील नावे काढावा. "DEPUTY DIRECTOR OF HEALTH SERVICES MUMBAI CIRCLE THANE"

२) SBI बँकेच्या धनाकर्ष व्यतिरिक्त इतर कोणत्याही बँकेचा धनाकर्ष (Demand Draft) स्विकारला जाणार नाही. SBI बँकेच्या धनाकर्ष (Demand Draft) शिवाय प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. ते अपात्र करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

झ) उमेदवाराचा फोटो व स्वाक्षरी -

१) उमेदवाराने गुगल फॉर्मची प्रिंट काढल्यावर फोटो करीता राखीव जागेवर त्याचे अलीकडील काढलेला सुस्पष्ट फोटो चिकटवावा. फोटो स्टेपल करू नये.

२) स्वाक्षरी करीता राखीव जागेत स्वाक्षरी करावी.

त्र) निवड प्रक्रिया -

१) मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे दि.२७/०४/२०२३ रोजीच्या पत्रानुसार निवड प्रक्रिया खालीलप्रमाणे राबविण्यात येणार आहे.

| विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक Qualifying exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारेत्र | मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे proportion काढावे. (उदा. ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे ५०% प्रमाणे proporation =६०*५०/१००=३०) | ५० गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घ्यावी.) | अधिकतम २० गुण द्यावेत. मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे २० प्रमाणे proportaion काढावे. (उदा. १. Staff Nurse पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता पूर्ण करुन अतिरिक्त B.Sc (Nursing) ही शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारास B.Sc (Nursing) च्या अंतिम वर्षात ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे २०% प्रमाणे proporation =६०*२०/१००= १२ गुण) | २० गुण |
| संबंधित पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण द्यावेत. (१वर्षाकरिता ६ गुण, जास्तीत जास्त ३० गुण) | ३० गुण |
| | | एकुण १०० गुण |

२) सदरील गुणानुक्रमानुसार निवड करताना उमेदवारांची एकाकी पद असल्यामुळे गुणांकन यादी (Merit List) तयार करण्यात येईल.

३) गुणांकन यादी तयार केल्यानंतर दोन किंवा त्यापेक्षा जास्त उमेदवारांना समान गुण असल्यास ज्या उमेदवाराचे वय जास्त आहे अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. तसेच उमेदवारांचे गुणांकन (Merit) व वय देखील समान असेल तर अशा वेळी उमेदवाराचा संबंधित पदाशी निगडीत अनुभव जास्त असेल अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

४) उमेदवारांकडुन प्राप्त ऑनलाईन अर्जानुसार त्यांचे गुणांकन करुन पात्र/अपात्र उमेदवारांची यादी तयार करुन संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. पात्र/अपात्र उमेदवारांच्या हरकती मागवून त्यांचे निराकरण करुन अंतिम निवड यादी प्रसिद्ध करण्यात यईल. निवड यादी प्रसिद्ध केल्यांनतर निवड झालेल्या उमेदवारांचे मूळ कागदपत्र पडताळणी करुन नियुक्ती आदेश निर्गमित करणेत



Scanned with CamScanner

येतील व मूळ कागदपत्र पडताळणी दरम्यान अनियमितता आढळून आल्यास सदर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

ट) सर्व साधारण सुचना-

१) गुगल लिंक मार्फत उपलब्ध करुन देण्यात आलेला अर्ज उमेदवारांनी भरणे आवश्यक आहे.

२) सदर पदभरती प्रक्रियेबाबतच्या सर्व आवश्यक सुचना व माहिती आरोग्य विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावरच वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. या करीता उमेदवारांनी www.nrhm.maharashtra.gov.in व https://arogya.maharashtra.gov.in या संकेस्थळास भेट देऊन माहिती प्राप्त करुन घेणे अनिवार्य राहील. पदभरतीच्या अनुषंगाने कोणत्याही उमेदवारास वैयक्तिक संपर्क साधण्यात येणार नाही.

३) जाहीरातीत नमूद केलेली पदे ही पुर्णतः कंत्राटी स्वरुपाची असून (११ महिने २९ दिवस) ती राज्य शासनाची नियमित पदे नाहीत या पदांचा राज्य शासनाच्या पदांशी काहीही संबंध नसून उमेदवार राज्य शासनांच्या नियमित पदावर समायोजन करण्यांची मागणी करु शकणार नाही.

४) जाहीरातीत नमूद केलेले पदाचे वेतन हे एकत्रित मानधन आहे.

५) निवड झालेल्या उमेदवारांना आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, ठाणे येथे रिक्त असलेल्या ठिकाणी नियुक्ती देण्यात येईल, याची नोंद घ्यावी. नियुक्ती आदेश दिल्यानंतर १० दिवसांच्या आत नियुक्तीचे ठिकाणी रुजू होणे बंधनकारक राहील. (उमेदवारांने कोणत्याही दबाव तंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करणेत येईल, अन्यथा त्यांची नियुक्ती आदेश संपुष्टात आणून, प्रतिक्षाधिन यादीतील पुढील उमेदवारांस नियुक्ती देण्यात येईल.)

६) गुगल फॉर्म भरण्यांची अंतिम तारीख दि. 20 / 07 /२०२३ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत असेल.

७) गुगल फॉर्म पुर्ण भरल्यावर त्याची प्रिंट काढावी, व इच्छुक उमेदवारांनी गुगल फॉर्म सोबत खालील कागदपत्रे १ ते १४ जोडण्यात यावीत. व उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ ठाणे, प्रादेशिक मनोरुग्णालय आवार, धर्मवीर नगर- २, ठाणे (प) ४००६०४ या पत्त्यावर दि.21/ 07 /२०२३ पुर्वी पोहोचेल अशा रीतीने हस्तदेय सादर करावा किंवा टपालाने/ कुरीयरने मिळेल अशा रीतीने पाठवावा. कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी (शनिवार, रविवार व सावर्जनिक सट्टीचे दिवस वगळून) कार्यालयीन वेळेत सकाळी ०९.४५ ते सायंकाळी ६.१५ वाजे पर्यंत स्वीकारले जातील.

१) पुर्ण माहिती भरलेल्या गुगल फॉर्मची प्रिंट
२) वयाचा पुरावा
३) पदवी/ पदविका प्रमाणपत्र (सर्व वर्षांचे प्रमाणपत्र)
४) गुणपत्रिका
५) संबंधित पदाशी निगडीत शासकीय/ निमशासकीय संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र कागदपत्रे
६) Tally ERP ९ Certificate
७) अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)
८) आधार कार्ड
९) पॅन कार्ड
१०) सध्याचा फोटो
११) अर्जदार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच नाव बदल असल्यास राजपत्र (Gazette)
१२) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र (प्रतिज्ञापत्र)
१३) फौजदारी गुन्हा दाखल नसल्याचे हमीपत्र



Scanned with CamScanner

१४) SBI बँकेचा Demand Draft

८) गुगल फॉर्मचा अर्ज, धनाकर्ष व आवश्यक कागदपत्रे एकाच लिफाफ्यात बंद करुन सादर करावे. सदर लिफाफ्यावर अर्जदाराचे नाव व पदाचे नाव नमूद करावे.

९) सदर पदभरती प्रक्रियेत आवश्यकतेनुसार बदल करण्याचे वा सदर पदभरती अंशतः किंवा पुर्ण रद्द करण्याचे अधिकार अध्यक्ष, निवड समिती तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ ठाणे यांना राखून ठेवले आहेत.

13/7

अध्यक्ष
निवड समिती
तथा
उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ ठाणे

O/C 13/07

13/07

13/7/2023



Scanned with CamScanner

**फौजदारी गुन्हा दाखल नसले बाबतचे**
**हमीपत्र**

मी.श्री./श्रीमती/ कुमारी ______________________________
वय____वर्ष सध्या राहणार______________________________
__________________________________________________
_____________________________, असे लिहुन देते/ देतो की, या पत्यावर ____ वर्षा पसून आज पर्यंत राहत आहे.

तरी मी वास्तव्य करीत असलेल्या वरील नमूद कालावधीत माझेविरुद्ध मी राहत असलेल्या कार्यक्षेत्रातील पोलीस स्टेशनच्या आभिलेखावर काहीएक दखल पात्र गुन्हा अथवा आक्षेपार्ह नोंदी नाही.

सही/-



Scanned with CamScanner

## प्रतिज्ञापत्र
## नमुना अ

मी. श्री./श्रीमती/ कुमारी ..............................................
............श्री.................................................
यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी वय ......... वर्ष, राहणार ,.............
................................................
या द्वारे असे जाहिर करतो/करते की,

(१) मी ................................................... या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला .................... (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक ०१ जानेवारी, २०२३ या नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या .....आहे. (असल्यास जन्म दिनांक नमूद करावा.)

(३) दिनांक ०१ जानेवारी, २०२३ रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक ०१ जानेवारी, २०२३ व तद नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल. याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

सही/-

दिनांक :-



Scanned with CamScanner